# बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव

Phone No. –( 02472) 220159

Email.exe.enggworksdharashin@gmail.com


जा.क्र.जिपधा/बांवि/आस्था-१/कावि/३५४ ते ३५६/२०२४ दिनांक- १४/०२/२०२४

प्रति,

------------------------------

------------------------------

------------------------------

विषय :- जिल्हा परिषद धाराशिव अंतर्गतगट-क संवर्गातील सरळसेवा पदभरती-2023 **कागदपत्र पडताळणीकरीता दि.20/02/2024 रोजी सकाळी 11.00 वाजता उपस्थित राहणे बाबत...**

संदर्भ :- १) जिल्हापरिषद धाराशिव यांचेकडील सरळसेवा पदभरती सन 2023 साठीची जाहिरात क्रमांक-1/2023 दिनांक 05/08/2023

२) तारतंत्री (वायरमन) यापदासाठी IBPS मुंबई यांचेकडील Online परिक्षेतील प्राप्त निकाल

उपरोक्त विषयी जिल्हापरिषद धाराशिव अंतर्गत गट-क संवर्गातील सरळसेवा पदभरती - 2023 साठी जाहिरात क्र.1/2023 दि.05 ऑगष्ट, 2023 च्याअनुषंगाने IBPS कंपनी मार्फत घेण्यात आलेल्या **तारतंत्री (वायरमन)** या पदाच्या Online परिक्षेमधील प्राप्त निकालानुसार पात्र गुणवत्ता धारक उमेदवारांची यादी या जिल्हा परिषदेच्या www.zposmanabad.gov.in व जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव येथील www.osmanabad.gov.in या संकेत स्थळावर दि. 14/02/2024 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**तारतंत्री (वायरमन)** पदासाठी जाहिराती मध्ये नमुद विविध प्रवर्गातील रिक्त पदेभरणेसाठी प्रवर्गनिहाय कागदपत्र पडताळणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी जिल्हापरिषदेच्या www.zposmanabad.gov.in व जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव येथील www.osmanabad.gov.in या संकेतस्थळावर दि. 14/02/2024 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. **तारतंत्री (वायरमन)** संवर्गातील भरावयाच्या प्रवर्ग निहाय रिक्त पदासाठी कागदपत्र पडताळणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुळ शैक्षणिक व इतरआवश्यक सर्व अभिलेखे तसेच जाहिराती मधील नमूद आवश्यक कागदपत्राची पडताळणी **दि.20/02/2024 रोजी सकाळी** 11.00 वाजता कै.यशवंतराव चव्हाण, जिल्हा परिषद सभागृह धाराशिव येथे करण्यात येणारआहे.

सबब याद्वारे आपणास कळविण्यात येते की, आपले मुळ शैक्षणिक व इतरआवश्यकअभिलेखे तसेच जाहिराती मधील नमूद आवश्यक कागदपत्र व त्याच्या एका साक्षांकित प्रतीसह कागदपत्र पडताळणीसाठी दि. 20/02/2024 रोजी वेळेवर उपस्थित रहावे. कागदपत्र पडताळणी साठी ठरवून दिलेल्या दिनांकास गैरहजर राहणा-या उमेदवारांच्या कागदपत्र पडताळणीसाठी नंतर विचार केला जाणार नाही. सदर उमेदवारास निवड प्रक्रियेसंबंधात कोणाताही दावा करता येणार नाही किंवा हक्क सांगता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

**सोबत :- कागद पत्र पडताळणीसाठी घेवून यावयाच्या कागदपत्राची यादी.**

(नितीन भोसले)
कार्यकारी अभियंता (बां) तथा
सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती
जिल्हा परिषद धाराशिव.

**प्रतिलिपी :-**

1) मा.जिल्हा धिकारी, धाराशिव तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती धाराशिव यांना माहितीस्तव सविनय सादर.

2) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धाराशिव यांना माहितीस्तव सविनय सादर.

(नितीन भोसले)
कार्यकारी अभियंता (बां) तथा
सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती
जिल्हा परिषद धाराशिव.

Scanned with OKEN Scanner

**जिल्हा परिषद धाराशिव सरळसेवा पदभरती-२०२३**

**या कार्यालयाने प्रसिध्द करण्यात आलेल्या तारतंत्री (वायरमन) पदासाठी** उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीस घेऊन यावयाचे कागदपत्रांची यादी

| अ.क्र | कागदपत्रे/प्रमाणपत्र |
|---|---|
| १. | संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या मूळ अर्जाची प्रिंट आऊट तसेच परीक्षा फी जमा केल्याचा पुरावा |
| २. | अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे स्वयंघोषणापत्र |
| ३. | शैक्षणिक अर्हतेचा पुरावा |
| ४. | वयाचा पुरावा |
| ५. | जन्माचा पुरावा |
| ६. | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याचा पुरावा |
| ७. | राखीव प्रवर्गातुन निवड झालेल्या उमेदवारांचे संबंधित प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र,जातपडताळणी प्रमाणपत्र |
| ८. | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (अर्ज सादर करण्याच्या दिनांकास वैध असणारे) |
| ९. | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा |
| १०. | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा |
| ११. | खेळाडुसाठीच्या आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा |
| १२. | अनाथ आरक्षणकरीता पात्र असल्याचा पुरावा |
| १३. | महाराष्ट्र राज्याचा अधिवास प्रमाणपत्र |
| १४. | महाराष्ट्र कर्नाटक सिमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावांमधील मराठी भाषीक उमेदवारांना सक्षम प्राधिका-याचा विहित नमुन्यातील दाखला |
| १५. | विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा |
| १६. | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा |
| १७. | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र |
| १८. | पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन असल्याबाबतचे प्रमाणपत्र |
| १९. | MS-CIT अथवा समकक्ष प्रमाणपत्र |
| २०. | टंकलेखन प्रमाणपत्र |
| २१. | लघुलेखन प्रमाणपत्र |
| २२. | अनुभव प्रमाणपत्र |
| २३. | नावातील बदलाबाबत प्रमाणपत्र/शासन राजपत्र (लागू असल्यास) त्याबाबतचा पुरावा |
| २४. | छायाचित्र ओळख पुरावा (आधारकार्ड, वाहन परवाना, पॅनकार्ड,राज्य निवडणुक आयोगाचे निवडणूक ओळखपत्र, पारपत्र, राष्ट्रीयकृत बॅकेचे खातेपुस्तक) |

**(नितीन भोसले)**
**कार्यकारी अभियंता (बां) तथा**
**सदस्य सचिव जिल्हा निवड समिती**
जिल्हा परिषद धाराशिव

Scanned with OKEN Scanner